पुढारी

# विद्यापीठ सत्र परीक्षेला ४ हजार ९८२ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ४ हजार ९८२ विद्यार्थी उपस्थित होते. सोमवारी मास्टर ऑफ कॉमर्स, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर आर्टस्, बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईन, मास्टर ऑफ रुरल स्टडीज, आर्टस् (व्होकल अँड इन्स्ट्रुमेंटल म्युझिक), बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, आर्टस् (वुमेन स्टडीज) आदी १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. बीए (डिफेन्स स्टडीज), बी.व्होक. आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. भरारी पथकाकडून २४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली.

**तरुण भारत**

# विद्यापीठ परीक्षेला ४९८२ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी १४ विषयांसाठी ४ हजार ९८२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेत भरारी पथकाकडून सांगलीत ४, कोल्हापूरात ८, साताऱ्यात १२ असे तिन्ही जिल्ह्यातून २४ कॉपीचे प्रकार उघडकीस आले. भरारी पथकाकडून नोंदीत दोषी विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत कारवाई करण्यात येणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचे तायक्वांदो स्पर्धेत यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या तायक्वांदो संघाने राजस्थानमधील जेजेटी विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वांदो पुरुष दक्षिण पश्चिम स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. कबीरसिंह ठाकूर यांनी रौप्य पदक व हर्षवर्धन सागर, ओंकार मार्तंड, शिरीष पडळकर, रुषिकेश कोडळे आणि आदित्य लाख यांनी कांस्य पदके मिळवली. डॉ. विनायक भागवत, प्रा.गौरव चव्हाण, पद्माकर कांबळे यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन लाभले.

महासत्ता



विद्यापीठ कबड्डी संघात निवड झालेल्या जयहिंदच्या दोन खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी अध्यक्ष सतिश डाळ्या, उदय चव्हाण, दिलीप ढोकळे, शशिकांत पाटील व इतर.

# शिवाजी विद्यापीठ कबड्डी संघात जयहिंदचे दोन खेळाडूंची निवड

इचलकरंजी,ता.५–

**इंदौर मध्य प्रदेश येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या कबड्डी संघात जयहिंद मंडळाच्या दोन खेळांची निवड झाली.**

या स्पर्धा चार ते आठ नोव्हेंबर अखेर इंदौर येथील देवी अहिल्या विद्यापीठ येथे संपन्न होत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम संघामध्ये जयहिंद मंडळाचे सौरभ फगरे, दीपक पाटील त्याचबरोबर परभणी येथे होणाऱ्या किशोर कबड्डी गट स्पर्धेसाठी कोल्हापूर जिल्हा संघात आदित्य अंकले याची निवड झाली आहे.

या निवडीबद्दल जयहिंद मंडळाचे अध्यक्ष सतीशभाऊ डाळ्या यांनी अभिनंदन व सत्कार केला. या प्रसंगी मंडळाचे कार्याध्यक्ष उदय चव्हाण, कार्यवाहक दिलीप ढोकळे, शशिकांत पाटील, सुनील सुतके, शंकर पवार, रुपेश जाधव, विद्यापीठ संघाचे व जय हिंद मंडळाचे कबड्डी प्रशिक्षक डॉ. देवेंद्र बिरनाळे, विजय लाड, अमित नवाळे यांनी शुभेच्छा दिल्या.